## कै.श्री.मु.ब.यंदे पुरस्कार
## कल्पना एक आविष्कार अनेक (एकूण वर्ष ३४)

महोदय/महोदया
स.न.वि.वि.

उपरोक्त संस्थेतर्फे "**कल्पना एक आविष्कार अनेक**" (**वर्ष १७ वे**) राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेची प्राथमिक फेरी जानेवारी २०२१ तर अंतिम फेरी फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात संपन्न होईल.
सध्याच्या कठीण परिस्थितीत निर्मिती खर्च कमी व्हावा तसेच प्रवास टाळावा या उद्देशाने या स्पर्धेची प्राथमिक फेरी ऑनलाईन पध्दतीने ‘अस्तित्व’तर्फे घेतली जाणार आहे. स्पर्धकांनी आपल्या एकांकिका चित्रित करून प्राथमिक फेरीच्या मूल्यंकनासाठी पाठवायच्या आहेत. एकांकिकेची व्हिडियो फाईल (Video File) स्पर्धकांनी astitvateam@gmail.com या ईमेलवर लिंकच्या स्वरुपात शेअर करावी. WeTransfer किंवा तत्सम फाईल शेअरिंग साईट्सचा वापर याकरता करावा. तालीम स्वरुपात/ अंतिम तांत्रिक स्वरुपात चित्रित केलेल्या एकांकिका ग्राह्य मानल्या जातील. स्पर्धेचे प्रवेशअर्ज www.astitva.co.in या संकेतस्थळावरुन उपलब्ध होतील. अर्ज आणि एकांकिका पाठवण्याची **अंतिम तारीख २६ जानेवारी २०२१** आहे. **प्राथमिक फेरीचा निकाल ३० जानेवारीला घोषित केला जाईल**.

**अंतिम फेरी पारंपारिक पद्धतीने नाट्यगृहात घेतली जाईल. स्पर्धेची अंतिम फेरी, फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात संपन्न होईल.** सदर स्पर्धेत भाग घेऊन ही स्पर्धा यशस्वी करण्यात आपण निश्चितपणे सहकार्य कराल, असा विश्वास आहेच.

**धन्यवाद!**
**आपला स्नेहाभिलाषी**
**"अस्तित्व"**
**स्पर्धेसाठी संपर्क**: +९१ ९०८२६३३२८८



**विषय सूचक: ज्येष्ठ अभिनेता "पद्मश्री" नाना पाटेकर**
**विषय- “हसू आणि आसू”**

**स्पर्धेचे नियम:**

- मास्क नाही तर स्पर्धेला प्रवेश नाही. कोविडपासून सुरक्षिततेच्या कुठल्याही नियमांचे उल्लंघन खपवून घेतले जाणार नाही.
- सोशल डिस्टन्सिंग पाळण्यासाठी, एकांकिका कमीतकमी कलाकार आणि तंत्रज्ञांच्या सहभागाने सादर व्हाव्यात.
- ही स्पर्धा व्यावसायिक, हौशी कलाकार आणि विद्यार्थ्यांसाठी खुली असेल.
- **स्पर्धेची प्राथमिक फेरी जानेवारी २०२१ तर अंतिम फेरी फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात संपन्न होईल.**
- सध्याच्या काळात कमीत कमी प्रत्यक्ष संपर्क टाळावा आणि कागदपत्रांची देवाणघेवाण टाळावी यासाठी ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. सहभागी संस्थांनी खालील कागदपत्रे केवळ ई-मेल (email) किवां व्हॉट्सऍप (WhatsApp) द्वारे पाठवावीत. प्रवेशअर्ज **पाठवण्याची अंतिम तारीख २६ जानेवारी** असून; प्रवेश अर्जासोबत **रु. ५००**/-. प्रवेश आकार आयोजक संस्थेकडे **२६ जानेवारी** पर्यंत भरणे आवश्यक आहे. प्रवेश आकार कोणत्याही कारणास्तव परत दिला जाणार नाही.
- अपूर्ण/चुकीची माहिती असलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही. प्रवेश अर्ज स्वीकारण्याचे सर्वाधिकार आयोजकांना असतील. खालील बाबींची पूर्तता सहभागी संस्थांनी करावी.
    - संपूर्ण भरलेला प्रवेश अर्ज
    - प्रवेश फी – ऑनलाईन भरणे (Paytm)
    - संहितेचा अंतिम आराखडा
    - रंगभूमी परीनिरक्षण मंडळाचे प्रमाणपत्र / पावती
    - लेखकाची परवानगी
    - नेपथ्य आणि प्रकाशयोजनेचे रेखाटन
    - कलाकार आणि तंत्रज्ञ यादी
    - एकांकिकेचे दृकश्राव्य चित्रीकरण (मोठ्या प्रमाणावर डाटा ड्राईव्ह लिंक शेअर करावी.)
- सध्याच्या कठीण परिस्थितीत निर्मिती खर्च कमी व्हावा तसेच प्रवास टाळावा या उद्देशाने या स्पर्धेची प्राथमिक फेरी ऑनलाईन पध्दतीने 'अस्तित्व'तर्फे घेतली जाणार आहे. स्पर्धकांनी आपल्या एकांकिका चित्रित करून प्राथमिक फेरीच्या मूल्यंकनासाठी पाठवायच्या आहेत.
- एकांकिकेची व्हिडियो फाईल स्पर्धकांनी astitvateam@gmail.com या ईमेलवर लिंकच्या स्वरुपात शेअर करावी. WeTransfer किंवा तत्सम फाईल शेअरिंग साईट्सचा वापर याकरता करावा. तालीम स्वरुपात/ अंतिम तांत्रिक स्वरुपात चित्रित केलेल्या एकांकिका ग्राह्य मानल्या जातील.
- प्राथमिक फेरीसाठी दाखल झालेल्या प्रवेशिकांचे मान्यवर परीक्षकांकडून मूल्यांकन करून अंतिम फेरीसाठी पाच ते सहा एकांकिकांची निवड केली जाईल.
- **स्पर्धेसाठी प्रवेश अर्ज आणि एकांकिका (विडिओ फाईल) पाठवण्याची अंतिम तारीख २६ जानेवारी आहे. प्राथमिक फेरीचा निकाल ३० जानेवारीला घोषित केला जाईल.**
- **अंतिम फेरी पारंपारिक पद्धतीने नाट्यगृहात घेतली जाईल. अंतिम फेरीत सादर करण्याचा, क्रम व वेळ ड्रॉ पद्धतीने ठरविण्यात येईल.**
- स्पर्धा समिती ठरवेल त्या दिवशी, वेळी आणि क्रमानुसार, स्पर्धक संस्थेला आपला नाट्यप्रयोग विनात क्रार सादर करावा लागेल.

- एकांकिकेचा कालावधी किमान ३५ मिनिटे व कमाल ४० मिनिटे असणे बंधनकारक राहिल. आधीच्या एकांकिकेचे नेपथ्य काढून प्रकाशयोजनेसाठी कमाल २० मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.या नियमाचे पालन करण्यासाठी विशेषत: नेपथ्यकार व प्रकाशयोजनाकार यांनी विचार करावा अशी अपेक्षा आहे.
- स्पर्धेत सादर झालेल्या एकांकिकेच्या यापूर्वी प्रयोग झाल्याची तक्रार आल्यास आणि तपासाअंती तसे सिद्ध झाल्यास, परीक्षकांच्या निर्णयानुसार कारवाई केली जाईल. परीक्षक मंडळाने दिलेला निर्णय हा अंतिम निर्णय समजला जाईल. तसेच सदर एकांकिकेचा निकाल राखून ठेवणे किंवा पारितोषिक परत घेण्याचे निर्णय आयोजक समितीला राहील.
- स्पर्धेच्या वेळेचे बंधन पाळणे प्रत्येक स्पर्धक संस्थेस बंधनकारक राहिल. स्पर्धक संस्थेने नियोजित सादरीकरणाच्या वेळेपूर्वी किमान ०१ तास आदी उपस्थित असणे बंधनकारक राहिल.
- प्राथमिक फेरी तालीम स्वरूपात होईल. अंतिम फेरीसाठी आयोजक संस्थेतर्फे **"विनामूल्य" १२ स्पॉट** (स्पॉटचे लोकेशन बदलण्यास परवानगी दिली जाणार नाही), नेपथ्यासाठी **०६ ठोकळे, ०६ प्लॅटफॉर्म,** एकांकिकेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे.
- सर्वसाधारण रंगभूषेसाठी (अंतिम फेरी) आयोजन संस्थेतर्फे मेकअप व्यवस्था करण्यात येईल. विशेष रंगभूषेची आवश्यकता असल्यास त्याचा खर्च स्पर्धक संस्थेला करावा लागेल.
- बॅकस्टेजला गर्दी टाळावी या हेतूने अंतिम फेरीत सादरीकरण करणाऱ्या संघांनी फक्त ०१ तास आधी नाट्यगृहात दाखल व्हायचे आहे. सादरीकरण झाल्याबरोबर त्यांनी लगेचच बॅकस्टेजमधून निघून जायचे आहे.
- नाट्यगृहपरिसरात सोशल डिस्टन्सिंगचे उल्लंघन करून कुठल्याही प्रकारची गर्दी/ संघ बैठक/ मोठा जमाव करण्यास परवानगी नाही.
- मुंबई व मुंबई बाहेरील संस्था या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील परंतु मुंबई बाहेरीलच्या कोणत्याही संस्थेला प्रवासखर्च देण्यात येणार नाही.
- कोणताही स्पर्धक (दिग्दर्शक / अभिनेता / अभिनेत्री / तंत्रज्ञ) कलावंतास एकाच एकांकिकेसाठी स्पर्धेत सहभागी होण्याची अनुमती राहिल.
- एकांकिका स्पर्धेचे परीक्षक नेमण्याचा अधिकार आयोजक संस्थेस असेल. परीक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम असेल व तो सर्व स्पर्धक संस्थास बंधनकारक राहील.
- एकांकिकेची संहिता पूर्णपणे नवीन असून या पूर्वी सदर संहितेचा / एकांकिकेचा कोठेही प्रयोग झालेला नसल्याचे लेखकाचे प्रमाणपत्र संहिते बरोबर देणे गरजेचे आहे.
- **एकांकिकेत / साहिंतेत विषय सूचक, आयोजक, अथवा कोणत्याही व्यक्तीचा, सामाजिक अथवा राजकिय संस्थेचा उलेख कटाक्षाने टाळण्यात यावा.**
- **कार्यक्रमात व नियमात फेरफार करण्याचा अधिकार स्पर्धा समितीकडे राहील. या संबंधी कोणतीही कारणे देण्यात येणार नाही.**

# प्रवेश अर्ज

- संस्थेचे / महाविध्यालयेचे नाव : ______________________
- एकांकिकेचे नाव : ______________________
- लेखकाचे नाव : ______________________
- दिग्दर्शकाचे नाव : ______________________
- संस्था प्रतिनिधीचे नाव : ______________________
- दूरध्वनी/ मोबाइल क्रमांक : ______________________
- ई मेल : ______________________
- डी.आर.एम. क्रमांक : ______________________

प्राचार्य / संस्था अध्यक्ष
सही व शिक्का

आयोजक
अस्तित्व /चार मित्र

कल्याण

| | |
|---|---|
| • प्रवेश अर्ज | |
| • संहितेचा अंतिम आराखडा | |
| • रंगभूमी परीनिरक्षण मंडळाचे प्रमाणपत्र/ पावती | |
| • नेपथ्य आणि प्रकाशयोजनेचे रेखाटन | |
| • लेखकाची परवानगी | |
| • कलाकार आणि तंत्रज्ञ यादी | |
| • एकांकिकेचे दृकश्राव्य चित्रीकरण (मोठ्या प्रमाणावर डाटा ड्राईव्ह लिंक शेअर करावी.) | |